**सातारा जिल्हा परिषद सातारा महिला व बाल विकास विभाग,**
**दुरध्वनी क्र -०२१६२-२३३७५२.**

जा.क्र.मबाक/कावि-१/५९/२०१८
दिनांक :- १७.०२.२०१८

प्रति,

-------------------------

-------------------------

विषय :- अंगणवाडीतील मुलांची मापे घेणेसाठी स्टेडीओमिटर्स व इन्फॅन्टोमिटरर्स खरेदी करणे साठीचे दर उपलब्ध होणे बाबत.

सातारा जिल्हा परिषद महिला व बाल विकास विभागा मार्फत अंगणवाडीतील मुलांचे मापे घेणेसाठी स्टेडीओमिटर्स पुरविणेची योजना सन २०१७-१८ मध्ये राबविणेत येत आहे. तरी खालील वर्णनानुसार स्टेडीओमिटर्स खरेदी करणेसाठी दरपत्रके मागविणेत येत आहेत.आपण आपले दरपत्रके या कार्यालयाकडे दि.२६/०२/२०१८ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यत समक्ष लिफाफाबंद सादर करावेत.

महिला व बाल विकास विभागाकडील तालुकानिहाय प्रकल्पानां सदर वस्तूंचा पुरवठां करावयाचा आहे. त्यासाठी येणा-या खर्चासह मान्यताप्राप्त कंपनींचे दरपत्रके मागविणेत येत आहेत. सविस्तर तपशिल सोबत सादर केला आहे.

Specification:- Measuring range : 20-205 cm
Graduation : 1 mm
Packing size : 25.75 * 14.25*4.75 inches
Gross Weight : 2.65 kg

**दरपत्रकासोबत खालील प्रमाणे कागदपत्रे जोडण्यात यावीत.**

**१. पहिला लखोटा**

१. कंपनीचे अधिकृत उत्पादक|विक्रेते असलेचे प्रमाणपत्र.
२.व्यवसाय करणेस मान्यता असलेचे प्रमाणपत्र(शॉपअॅक्ट)
३.आर्थिक वर्ष सन २०१६-१७ चे आयकर भरणा केलेचे प्रमाणपत्र.
४.पॅन कार्डची प्रत.
५.जी.एस.टी.रजिस्ट्रेशन प्रत.
६.ISIमार्क उत्पादित वस्तुचे बाबतीत भारतीय मानक संस्थेने BIS प्रमाणित केलेले विधीग्राहय प्रमाणपत्र .

७.ISIमार्क नसलेले उत्पादित वस्तुचे बाबतीत मान्यता प्राप्त संस्थेकडुन तपासणी केलेचा तपासणी अहवाल.

**२. दुसरा लखोटा**

१. यामध्ये सर्व करासहीत प्रति नगाचा दर नमुद करावा.

सदर दरपत्रके उघडणे,स्थगित ठेवणे अथवा रदद करण्याचे अधिकार महिला व बाल विकास विभाग जिल्हा परिषद यांचेकडे राहतील.

दरपत्रके शक्य झालेस दिनांक २६/ ०२/२०१८ रोजी अथवा तदनंतर महिला व बाल विकास विभाग सातारा जिल्हा परिषद चौथा मजला येथे उघडणेत येतील.

महिला व बाल विकास अधिकारी
सातारा जिल्हा परिषद,सातारा

प्रत :- उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.)जिल्हा परिषद,सातारा
२/- जिल्हा परिषद संकेतस्थळावर प्रसिध्दीसाठी.